

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 85 (A)

# NATIONAL INTEGRITY & SARDAR VALLABHBHAI PATEL

**Guest Editor :**
Dr. B. S. Yadav
Principal,
K.J. Somaiya College of Arts,
Commerce & Science, Kopargaon
Dist. Ahmednagar [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue :**
Dr. K. L. Giramkar
Dept. of History
K.J. Somaiya College of Arts,
Commerce & Science, Kopargaon
Dist. Ahmednagar [M.S.] INDIA

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE ★ Pabal Tal.Shirur Dist.Pune.

RESEARCH JOURNEY


This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

COSMOS IMPACT FACTOR

Search

HOME | INDEXED JOURNAL | SUGGEST JOURNAL | REQUEST IF | DOWNLOAD LOGO | REVIEWER PANEL



**Category**

- INDEXED JOURNAL
- SUGGEST JOURNAL
- JOURNAL IF
- REQUEST FOR IF
- DOWNLOAD LOGO
- CONTACT US

SAMPLE CERTIFICATE

SAMPLE EVALUATION SHEET

# Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |
| Cosmos Impact Factor | **2015 : 3.452** |

GIF GLOBAL IMPACT FACTOR

Institute for Information Resources

News Updates Now, Annual membership fee is of just 40 Dollars for existing members and they can renew their membership for year 2016-



**Get Involved**

- Home
- Evaluation Method
- Journal List
- Apply for Evaluation/Free Service
- Journal Search

**Recently Added Journals**

| Research Journey | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Quarterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | researchjourney.net |
| Global Impact and Quality Factor | |
| 2014 | 0.565 |
| 2015 | 0.676 |

## Research Journey

**SJIF 2018:**

**Under evaluation**

Area: Multidisciplinary

Evaluated version: online

**Previous evaluation SJIF**

2017: 6.261
2016: 6.087
2015: 3.986
2014: 3.009

**The journal is indexed in:**

SJIFactor.com

**Basic information**

| | |
|---|---|
| Main title | **Research Journey** |
| Other title [English] | Research Journey |
| Abbreviated title | |
| ISSN | 2348-7143 (E) |
| URL | http://WWW.RESEARCHJOURNEY.NET |
| Country | India |
| Journal's character | Scientific |
| Frequency | Quarterly |
| License | Free for educational use |
| Texts availability | Free |

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2019 Special Issue – 85(A)

## SARDAR VALLABHBHAI PATEL & NATIONAL INTEGRITY

**Guest Editor**
Dr. B. S. Yadav
K.J. Somaiya College, Kopargaon
Tal. Kopargaon, Dist. – Ahmednagar

**Executive Editor of the issue:**
Dr. K. L. Giramkar
Head. Dept. of History,
K.J. Somaiya College, Kopargaon
Tal. Kopargaon, Dist. – Ahmednagar

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 700/-

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E- Research Journal
ISSN : 2348-7143 January-2019
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 85 (A) : Sardar Vallabhbhai Patel & National Integrity
UGC Approved Journal

# INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | National Integrity and Sardar Vallabh Bhai Patel | Prof. Sanjay Swarnkar | 05 |
| 2 | Iron Man Sardar Vallabhbhai Patel (1870 – 1950) | Dr. Nalini Waghmare | 13 |
| 3 | Saradar Vallabhbhai Patel : A Brief Biography | Dr. Nandkumar Jadhav | 17 |
| 4 | Sardar Vallabh Bhai Patel and Indian Politics | Dr. Keshav Lahane | 20 |
| 5 | Sardar Vallabhabhai Patel's Role in Indian National Movement | Prof.R.K.Suryawanshi | 24 |
| 6 | Sardar Vallabhbhai Patel Contributions to Modern India | Prof. Varsha Aher | 28 |
| 7 | सरदार पटेल और भारतीय राजनीति | डॉ.सुरेश मिश्र | 31 |
| 8 | आधुनिक भारत के निर्माता लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल | डॉ. योगेश दाणे | 36 |
| 9 | सरदार वल्लभभाई पटेल देसी राज्यों रियासतों के एकीकरण में योगदान | प्रा. राधाकृष्ण जोशी, प्रा. जी.व्ही. गट्टी | 41 |
| 10 | राजस्थान का एकीकरण : सरदार पटेल का योगदान | डॉ. विनोद सोनवणे | 43 |
| 11 | सरदार वल्लभभाई पटेल-पंडित नेहरू संबंध | डॉ.के.एल.गिरमकर | 50 |
| 12 | सरदार वल्लभभाई पटेल यांचे भारतीय राष्ट्रीय चळवळीतील योगदान | डॉ. शामराव घाडगे | 54 |
| 13 | सरदार वल्लभभाई पटेल यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान | डॉ. तानाजी फुलारी | 58 |
| 14 | सरदार वल्लभभाई पटेल आणि हैद्राबाद संस्थान | डॉ. भूषण फडतरे | 64 |
| 15 | भारतीय संस्थानांच्या विलीनिकरणात सरदार पटेलांची भूमिका | डॉ.मुकुंद देवर्षी | 70 |
| 16 | सरदार वल्लभभाई पटेल यांची धर्मनिरपेक्षता : एक चिकित्सा | डॉ.के.एस.अंबाडे | 76 |
| 17 | शेतकरी लढ्याच्या नेतृत्वातून सरदार पटेल यांचा राष्ट्रीय नेता म्हणून उदय(1920-1930) | डॉ. उत्तम पठारे | 79 |
| 18 | पंडित नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल | प्रा.सुनील लोखंडे | 87 |
| 19 | सरदार वल्लभभाई पटेल यांचे सामाजिक व राजकीय विचार | डॉ. पी.बी. सिरसट | 89 |
| 20 | सरदार वल्लभभाई पटेल व राष्ट्रीय कॉंग्रेस | डॉ. मीना साळे | 93 |
| 21 | सरदार वल्लभभाई पटेलांचे भारतीय संविधान निर्मितीतील योगदान | प्रा. हरीदास जाधव | 96 |
| 22 | अखंड भारताचे निर्माते सरदार पटेल | डॉ. रेहानाआरा बेग | 102 |
| 23 | सरदार वल्लभभाई पटेल यांचे कामगारविषयक विचार व कार्ये | प्रा.आंबादास केत | 107 |
| 24 | समकालीन लेखनातून दिसणारे सरदार वल्लभभाई पटेलांचे अज्ञात पैलू | डॉ.पद्माकर प्रभूणे | 115 |
| 25 | हैद्राबाद संस्थानाचे विलीनीकरण व सरदार वल्लभभाई पटेल | डॉ. दिगंबर सोनवणे | 117 |
| 26 | स्वातंत्र्यलढ्यातील सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान | प्रा.के.जे.चव्हाण | 120 |
| 27 | संस्थानांचे विलीनीकरण व सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | डॉ. राजाराम सोनवणे | 125 |
| 28 | पोलादी पुरुष वल्लभभाई पटेल त्यांची धुळे भेट | डॉ. आंबादास मंजुळकर | 128 |
| 29 | पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल | प्रा. श्रीमती वंदना देशमुख | 132 |
| 30 | भारतीय सार्वजनिक जीवनातील एक अद्वितीय व्यक्तिमत्व सरदार वल्लभभाई पटेल | प्रा.आर.एस.झरेकर | 137 |
| 31 | सरदार वल्लभभाई पटेल आणि हैदराबाद संस्थानाचे विलीनीकरण | डॉ. प्रशांत साबळे | 140 |
| 32 | अखंड भारताचे शिल्पकार | डॉ. सोमनाथ गुंजकर | 146 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 85 (A) : Sardar Vallabhbhai Patel & National Integrity
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# अखंड भारताचे निर्माते – सरदार पटेल

डॉ. रेहानाआरा ईस्माइल बेग
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्री पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ

भारताच्या स्वातंत्र्यलढयाच्या अखेरच्या टप्प्याचे नेतृत्व करणाऱ्या तीन प्रमुख नेत्यांमध्ये पटेल हे आघाडीचे सदस्य होते. त्यांनी भारताच्या जडणझडणीत मोलाची कामगिरी बजावली आहे. लॉर्ड वेलस्लीने निर्माण केलेली संस्थानिक व्यवस्था त्यांनी अहिंसकपणे मोडून काढली. नव्या भारताचे निर्माते म्हणून पटेलांनी स्वातंत्र्योत्तर काळात काम केले आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या डावपेचापासून भारताला वाचवले. हिंदुबहुल प्रदेश भारतात सामील करून घेतला १९४६ मध्ये कॅबिनेट मिशनने स्वातंत्र्य आणि फाळणीच्या संदर्भात सुचविलेला तोडगा गांधी, आझाद यांनी भारताच्या अखंडतेचा विचार करून स्विकारला परंतु पटेल यांनी हा तोडगा पाकिस्तान होण्यापेक्षा वाईट आहे म्हणून नाकारला. २० फेब्रुवारी १९४७ रोजी ॲटली यांनी धोरणात्मक निर्णय दिला की, पाकिस्तानबरोबर संस्थानांनाही स्वातंत्र्य जाहीर केले. त्यानुसार १५ ऑगस्टला संस्थानिक व त्यांची संस्थाने स्वतंत्र होणार होती. तेंव्हा तिसरे सत्ताकेंद्र स्थापन झाले असते. पुढे ही संस्थाने पाकिस्तानमध्ये जाण्याचा धोका अधिक होता. संलग्नीकरणामुळे ते पाकिस्तानमध्ये गेले असते. वल्लभाईंनी ही कारस्थाने आपल्या व्यक्तीमत्वाच्या जोरावर उधळून लावली. त्रावणकोर,हैद्राबाद,जुनागड, जामनगर,जोधपूर आणि मध्य भागातील राज्ये यांचा मुख्य प्रश्न यासंदर्भात होता. १५ ऑगष्ट १९४७ पूर्वीच वल्लभभाईंनी ही संस्थाने विलीन करून घेतली. भारत किंवा पाकिस्तान मध्ये, अपवाद जुनागड,हैद्राबाद आणि काश्मीरचा राहिला. काश्मिर हे नेहरूंच्या अखत्यारीत होते. पटेलांनी संस्थाने विलीन करून एका बलशाही भारताची निर्मिती केली कॉंग्रेसचे नेते आणि पटेलांचा फाळणीला विरोध होता. ५६० संस्थानांचे विलीनीकरण केले. संस्थानांचे विलीनिकरण झाल्याशिवाय आपल्याला स्वराज्य मिळणार नाही हे सुतोवाच पटेलांनी केले. पटेल हे गांधींच्या सत्याग्रहाचा कणा होते. १९३० मध्ये गांधींनी काढलेल्या दांडी मार्चमध्ये पटेलांनी महत्वाची भूमिका बजावली तर बार्डोलीच्या सत्याग्रहात त्यांनी लेनिनची भूमिका बजावली. १९३७ च्या प्रादेशिक निवडणुकांच्या संदर्भात एका कडक अधिकाऱ्याची भुमिका निभावली, पटेल शिस्तीच्या बाबतीत कोणतीही तडजोड करत नसत. कॉंग्रेसच्या ऐक्याला व सामर्थ्याला त्यांचे महत्वाचे योगदान होते. ५६० पेक्षा जास्त संस्थाने भारतात विलीन करून त्यांनी चर्चिलच्या साम्राज्यवादी धोरणाला सुरूंग लावला. पटेल धाडसी,प्रामाणिक आणि यथार्थवादी होते गांधींच्या कल्पनांना त्यांनी वास्तवात उतरविले.

फाळणी आणि पटेल – ब्रिटीशांनी भारत सोडले तेंव्हा भारताच्या अखंडतेलाही धोका होता. ५०० पेक्षा जास्त संस्थाने त्रिशंकू अवस्थेत होती.त्यांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा किंवा स्वतंत्र राहण्याचा पर्याय होता. कॉंग्रेस कार्यकारी समितीने एक प्रस्ताव पास केला. यानुसार पंजाबला दोन भागात विभाजित केले मुस्लिम बहुल भाग पाकिस्तानला जोडण्याचा प्रस्ताव होता. पंजाबी मुसलमानांना लीगने केलेल्या पाकिस्तान तयार करण्याच्या मागणीचे परिणाम काय होतील याची पूर्व सूचना दिली गेली होती. गांधींना ही गोष्ट माहित नव्हती परंतु नंतर ती त्यांना सांगण्यात आली तेंव्हा गांधींनी याला विरोध केला हा प्रस्ताव जीनांव्दारे केलेल्या फाळणीच्या मागणीचं एकमेव उत्तर आहे असे उत्तर नेहरूंनी दिले. एप्रिलमध्ये माउंटबॅटन यांच्या बरोबर झालेल्या बैठकीत गांधींनी सध्याचे मंत्रीमंडळ बरखास्त करण्याचा प्रस्ताव ठेवला आणि जीना यांना संपूर्ण

मुस्लिम प्रशासन नेमायला सांगावे असे म्हटले. भारत यादवी युध्दाच्या कडयावर उभा होता हे जीनांचे विधान गांधींनी नजरेआड केले. १९२० मध्ये गांधींनी भारतीय स्वातंत्र्यापेक्षा खिलाफत चळवळीला अधिक महत्व दिल्याची ही पुनरावृत्ती होत होती, भारतीय अखंडता त्यांना महत्वाची वाटत होती. पटेलांमधील वास्तववादयाला हे मान्य नव्हते. त्यांना कॅबिनेट मिशनच्या ग्रुपिंग स्कीम अंतर्गत ठरल्याप्रमाणे भारताच्या अखंडतेपेक्षा विभाजन अधिक योग्य वाटत होते. विभाजन स्विकारले नाही तर दंगे होणारच. सैन्य, पोलिस यांनाही सांप्रदायिक मतभेदांपासून दूर ठेवता येणार नाही. परिणामी जवळ आलेले स्वातंत्र्य पुन्हा दूर जाण्याची शक्यता होती.

१९४६ च्या मध्यास झालेल्या मंत्रीमंडळ मिशनच्या विचारसभेत कॉंग्रेस जीनांकडून हळूहळू हरत असलेली पटेलांना दिसली. मिशनची ग्रुपिंग योजना तर जीनांसाठी एखादया भेट वस्तू सारखीच होती. तिच्यात त्यांना भारताच्या दोन्ही बाजूंना एक एक पाकिस्तान मिळणार होता, ग्रुप बी मध्ये अविभाजित पंजाब, सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांत होता तर ग्रुप सी मध्ये पूर्व बंगाल, पूर्वेकडील हिंदुबहुल आसाम होता. कमजोर ग्रुप ए वर( ज्यात भारत अंतर्भूत होता ) जीनांचे राज्य असते कारण त्यात असे मुसलमान होते जे जीनांशी पंजाब, सिंध आणि बंगालमधल्या मुसलमानांपेक्षा अधिक एकनिष्ठ होते. पाकिस्तानचा भाग बनण्याची इच्छा असलेल्या या लोकांनी आणखी विशाल पाकिस्तान बनवण्यासाठी भारताकडून सत्ता हिसकावण्याचा प्रयत्न नक्कीच केला असता. भारतातून पाकिस्तानात गेलेल्या लोकांच्या घोषणेतून ही इच्छा स्पष्ट होत होती. शिवाय जीनांना भारतातील संस्थानिकांचं सुध्दा समर्थन मिळालं असतं. ते नंतर मिळाले देखील. गांधी मिशनच्या योजनेच्या बाजूने होते त्यांच्या मते यामुळेच भारताची अखंडता कायम ठेवली जावू शकत होती. अंतरीम सरकारमध्ये मुस्लिमलीगचा अंतर्भाव केला गेला त्यामूळे कॉंग्रेसची अवस्था कमजोर होवू लागली. कालांतराने ॲटलींच्या पॉलीसीनुसार जीनांच्या पाकिस्तानची मागणी मान्य झाली. पटेल यांनी नंतर उरलेल्या भारताला वाचविण्यासाठी गांधींपासून वेगळे झाले आणि पंजाबप्रमाणे आसाम व बंगालच्याही विभाजनाची मागणी केली. १९४८ पर्यत सत्ताहस्तांतरण होणे आवश्यक असल्याचा आदेश ॲटलींचा लागू करण्यासाठी नवे व्हाइसरॉय माउंटबॅटन भारतात आले तेंव्हा त्यांना भारत अराजकतेच्या गर्तेत चालल्याचे दिसले परंतु पटेल यांनी भारतीय परिस्थिती वरली विभाजन, अधिराज्य अवस्था आणि संस्थानिकांशी संबंध या तीन महत्वाच्या मुदयासंदर्भातील त्यांच्या वास्तववादी दृष्टीकोनासंदर्भात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. पटेल आणि बॅटन यांची भूमिका परस्परपूरक होती दोघांनीही मिळून भारताला एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून प्रतिष्ठा मिळवून दिली. ब्रिटनकडून सत्ता भारत आणि पाकिस्तानकडे हस्तांतरित करण्यात एक दुसऱ्याला मदत केली. अखंड भारताचे निर्माते म्हणून पटेलांकडे पाहिले जाते.

**संस्थानांचे विलीनिकरण –**

शांततापूर्वक आणि ठरलेलया कालमर्यादेत सत्तेचे हस्तांतरण झाले.यात पटेलांची महत्वाची भूमिका राहिली त्यांना संस्थानांचा मंत्री म्हणून नियुक्त केले गेले. संस्थानिकांना त्यांनी राष्ट्रमंडळाचे सदस्य होण्यासाठी मंजुरी दिली नाही. परिणामी संस्थानिकांचे तिसरे अधिराज्य अस्तित्वात आले नाही. पटेलांनी आपल्या बुध्दिमत्तेच्या आधार संस्थानिकांचे मार्गदर्शन केले, संस्थानिकांशी मैत्री केली, संस्थानिकांची जागृती घडवून आणली त्यांना जाणीव करून दिली की, पूर्वीच्या काळी मतभेद, ईर्षा आणि एकमेकांबरोबर होणारे भांडण यामूळे आपल्यात फूट पडली आणि आपल्याला पारतंत्र्य भोगावे लागले. स्वातंत्र्य जवळ आहे, भारताच्या सुरक्षेसाठी आणि बचावासाठी एकजूट आवश्यक आहे, परस्पर सहकार्याची गरज आहे असे झाले नाही तर देशात फुटिरतावादी विचार रूजतील, अराजक आणि अव्यवस्था निर्माण होईल. पटेलांच्या संस्थान

विलिनीकरणाच्या भूमिकेला संस्थानिकांनी पाठिंबा दिला. बिकानेरच्या महाराजांनी म्हटले की, भविष्यात भारतीय संघराज्यात संस्थानांना योग्य स्थान मिळेल या संघाच्या निर्मितीत आपणास संपूर्ण सहाकार्य करण्यात आम्हाला अभिमान वाटेल. १५ ऑगस्ट १९४७ या ऐतिहासिक दिवशी भारत स्वतंत्र झाला आणि संस्थाने अखंड भारताचे अविभाज्य भाग बनले. संस्थाने विलीन करतांना अनेक संस्थानां बरोबर त्यांचे खटके उडाले उदाहरणार्थ ओडिसा, छत्तीसगड राज्यातील एकूण ४१ संस्थाने विलीन करण्यासाठी गेल्यावर त्यांच्या बरोबर वाद झाला त्यांनी संस्थानिकांना स्पष्ट शब्दात सांगितले की, पूर्वीप्रमाणे आपण आता कारभार करू शकत नाही आपली सत्ता तुम्हाला लोकांच्या हाती सोपवावीच लागेल. शासकाने काळाबरोबर चालून लोकशाहीचा जमाना स्विकारला पाहिजे. ओडिसाच्या संस्थनिकांनी वेगळा संघ निर्माण करण्याची अनुमती मागितली परंतु पटेलांनी या मागणीच्या उत्तरादाखल कडक धोरण अवलंबले. पटेल म्हणाले– मी तुम्हांपैकी प्रत्येक संस्थानिकाला त्याच्या संस्थानाबरोबर एकटयाने सोडायला तयार आहे पण तुम्हासर्वाना मी एक संघ (युनियन) तयार करण्याची अनुमती कधीही देणार नाही. तुम्ही हे लक्षात ठेवा की, जर कुणा संस्थानिकाला आपल्या प्रजेशी व्यवहार करताना, प्रजेचे प्रश्न सोडवण्या संदर्भात माझ्या मदतीची गरज भासली तर मी त्यांना मदत करणार नाही. तेंव्हा संस्थानिक निराश होवून त्यांनी पराभव स्विकारला. भारतीय राज्यांच्या एकीकरणाची ही घटना युगप्रवर्तक होती ती पटेल यांच्या दूरदृष्टीमुळे आणि मुत्सद्दीपणानेच शक्य झाली. संस्थान विलीनिकरणाची ही सुरवात १४ डिसेंबर १९४७ ला कटक येथे झाली ही एक प्रभावशाली सुरवात होती. ५६० संस्थांनांच्या विलीनीकरणाला सुमारे १८ महिने लागले.

राजस्थानची निर्मिती महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक होती. विभाजीत राजस्थानी लोकांना एकत्रीत करण्यात पटेलांची भूमिका महत्वाची होती. यातून राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्नही बऱ्याच प्रमाणात सुटला. राजस्थान हे पाकिस्तानच्या सीमेला लागून होते आणि तिथे जीनांच्या जोधपूरला पाकिस्तानात ओढण्याच्या कटू आठवणी ताज्या होत्या. मुत्सद्दीपणाने स्वतंत्र, गौरवशाली संस्थानिकांच्या अहंकाराला धक्का न लावता बिकानेर, जयपूर, जोधपूर आणि उदयपूर यांना एका मजबूत गटात जोडणं हे पटेल यांच्यासाठी एक महत्वाचं यश होतं. संस्थानिकांना एक लोकशाही छत्राखाली आणणं अवघड काम पटेलांनी सोपं करून दाखवलं हे जिकरीचे काम होते. त्रावणकोर हे भारताच्या दक्षिण टोकावर वसलेलं एक हिंदुराज्य होतं त्याला पुरातन सागरी परंपरा होती. सी.पी. रामस्वामी अय्यर यांनी बंडाचा झेंडा उभारून स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला संपूर्ण भारतासाठी एक राज्यघटना झाली नाही तर त्रावणकोर एक स्वतंत्र राज्य घोषीत करू अशी त्यांनी भूमिका घेतली. सी. पी. यांनी आपल्या अहंकारातून स्वत:ला इतर हिंदु राज्यांपासून स्वतंत्र ठेवले होते. स्वतंत्र भारताच्या राजकारणाच्यादृष्टीने गंभीर बाब ही होती की, ब्रिटिशांचे राज्य संपल्यावर काही भारतीय संस्थानांची स्वतंत्र राहण्याची इच्छा भारताच्या एकतेला आणि प्रतिष्ठेला खरा धोका हा संस्थानांच्या स्वतंत्र राहण्याच्या हटटाचा आहे. सर्व संस्थानांनी असाच मार्ग अवलंबला तर भारताचे तुकडे तुकडे होतील. पटेलांनी मात्र या बाबत ठामपणे मत मांडले की, जो पर्यंत कॉग्रेसने त्रावणकोर मध्ये पाय रोवलेले आहेत तोपर्यंत त्रावणकोरच्या स्वातंत्र्याचा किंवा सार्वभौमत्वाचा प्रश्नच येत नाही. पटेलांनी सी. पी. ना सांगून समजावून त्रावणकोर भारतात विलिन करून घेतले. त्रावणकोर आणि कोचिन या संयुक्त राज्याचं एक जुलै १९४९ ला त्रिवेंद्रम येथे उद्‌घाटन करण्यात आले पटेल त्रावणकोरच्या बाबतीत ठाम राहिले त्याचा परिणाम इतर संस्थानांवरही झालेला दिसतो.

जोधपूर पाकिस्तानमध्ये जाण्यापेक्षा ते भारतात विलिन होणं हा पटेलांचा मोठा विजय होता. भोपाळच्या नवाबांचा कराची, जोधपूर, भोपाळ यांचा एक संघ स्थापन करण्याचा मनसुबा होता. जीनांचा हा मुख्यउद्देश होता

तो नवाब पूर्ण करणार होते यामुळे भोपाळ, इंदौर आणि मध्य भारतातील काही संस्थाने, भोपाळच्या महाराजांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र राज्यसंघ तयार करण्यात यशस्वी झाले असते तर हा राज्यसंघ पाकिस्तान मध्ये समाविष्ट झाला असता. जीनांना जोधपूरच्या महाराजांना अनेक अमिषं दाखवली, भोपाळच्या महाराजांनीही आमिषें दाखवली याला बळी पडत जोधपूरच्या महाराजांनी उदयपूरच्या महाराजांना या योजनेत सामील करून घेण्याचे आमंत्रण दिले परंतु उदयपूरचे महाराज भारताबरोबर एकनिष्ठ होते ते या योजनेत सामील झाले नाहीत. बिकानेरच्या महाराजांनी देखील जोधपूरचा प्रस्ताव फेटाळला. इंग्लडने भारताकडे सत्ता हस्तांतरीत केलेली नसल्याने पटेलांना संस्थानिकांशी औपचारिकरित्या बोलण्याचा अधिकार नव्हता. जोधपूर हे हिंदुबहुल राज्य असल्याने ते भारतात सामील होणे जास्त संयुक्तीक आहे हे पटल्याने जोधपूरच्या महाराजांनी भारताबरोबर राहण्याचा निर्णय घेतला.जोधपूर बरोबरच अरबी समुद्रातील एक महत्वाचे बंदर असलेल्या काठियावाड वर सुध्दा नांची नजर होती. जामनगरमध्येही हीच परिस्थिती होती. जामनगरचे बेदीबंदर संदर्भात जीना सौदा करत होते. त्यामुळे हे बंदर आणि जुनागड मधील वेदावळ हे बंदर कराची क्षेत्रात गेले तर याचा दुषरिणाम मुंबई बंदरावर होणार होता. वल्लभभाईंनी जामसाहेबांचे मन वळविले आणि गुजरात व काठियावाड भारतात सामील करून घेतले. राजपूत राज्यांच्या एकीकरणा इतकंच हे एकीकरण महत्वाचं होतं परंतु हे अवघड ही होतं. कारण त्यात २२२ विभिन्न प्रकारची संस्थाने होती बऱ्याचशा संस्थांनांचे आपल्या सीमाक्षेत्राच्या बाहेरही छोटे छोटे इलाखे होते. अशा परिस्थितीमुळे काठीयावाडमध्ये अराजकता होती, व्यापार ठप्प होता,तस्करी मोठया प्रमाणत होत होती.मोठया प्रमाणत राजकीय विस्कळीतपणा आलेला होता. काठियावाडची संस्थानं एक व्हावी हे महात्मा गांधींचे स्वप्न होते ते एकीकरणामुळे सत्यात आले. पटेलांमुळे काठियावाडचे सर्व संस्थानिक एक झाले त्याच्यादृष्टीने भारताची एकता अधिक महत्वाची होती.

भोपाळचा संस्थानिक मुस्लिम होता परंतु या संस्थानातील बहूतांश लोक हिंदु होते. हा नवाब त्रासदायक होता. इतर संस्थानिकांना पाकिस्तानात सामाविष्ट होण्या संदर्भात कारस्थान करत होता. तो धूर्त व आक्रमक होता. भारताच्या एकीकरणाच्या स्वप्नाला तो धुळिस मिळवण्याचा प्रयत्न करत होता तो पाकिस्तानचा एजंट म्हणून काम करत होता. पटेलांनी भोपाळच्या नवाबावर मात केली आणि त्याचा बिकानेर व पतियाळाच्या महाराजाकडून जबरदस्त पराभव केला २५ ऑगस्ट १९४७ ला भोपाळ संस्थान भारतात विलीन झाले. भोपाळच्या नवाबाचे समर्पण हे पटेलांसाठी खूप मोठे यश होते त्यामुळे तिसरी शक्ती निर्माण करण्ययाच्या मार्गाने पोलिटिकल डिपार्टमेंटच्या भारतात अडथळे निर्माण करण्याच्या योजनांचा शेवट झाला.

जुनागडचे विलीनीकरण पाकिस्तानात झाले तर हे विलीनीकरण अयोग्य असल्याचे दाखवून दिले. जुनागडची भारताशी भौगोलिक संलग्नता आहे, जुनागडच्या लोकसंख्येची संरचना, लोकांचे मत लक्षात घेण्याची गरज होती यावर पाकने कोणतेही उत्तर दिले नाही.अनेक प्रयत्नांनी हे संस्थान भारतात विलीन झाले पटेलांनी दिलेल्या अश्वासनानंतर २० फेब्रुवारी १९४८ रोजी संस्थानात जनमत घेण्यात आले जनमताने भारतात विलिन होण्याचा निर्णय झाला. कोणतीही जिवीत किंवा वित हानी न करता हे संस्थान भारतात विलीन झाले. काठियावाडचा एक संघपणा जपल्याबद्दल काठियावाडमधील सर्व संस्थानिकांनी व लोकांनी कृतज्ञता व्यक्त केली.

हैद्राबादमध्ये भारताला इतर कुठल्याही संस्थानापेक्षा अधिक गंभीर परिस्थितीला तोंड दयावे लागले. हैद्राबाद हे भारताच्या मध्यावधी असलेले महत्वाचे संस्थान परंतु पाकिस्तानच्या प्रभावाखाली होता. हैद्राबादची परिस्थिती स्फोटक होत होती. तेथे भारतीय सेना पाठवण्याच्या विरोधात नेहरू आणि बॅटन होते पटेलांच्यापुढे

ही मोठी अडचन होती. हैद्राबाद संस्थान स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न चालू होता. निजामाला शक्तीशाली बनवण्याचे प्रयत्न केले जात होते. निजामाने ब्रिटिश राष्ट्रमंडळात तिसरे अधिराज्य स्थापन करायचं ठरवलं होतं. सर्वोच्च संस्थानिक आणि ब्रिटिश सरकारचा सर्वात एकनिष्ठ मित्र अशा शब्दात ब्रिटनच्या राजाने निजामाचा गौरव केला होता. भारतीय स्वातंत्र्याच्या विधेयकात संस्थानांना स्वातंत्र्य देण्याची तरतूद नव्हती त्यामुळे निजाम निराश होता. हैद्राबाद संस्थान तो भारत किंवा पाकिस्तानमध्ये विलीन करू इच्छित नव्हता. परंतु पटेलांनी स्पष्ट शब्दात बॅटन यांना सांगितले हैद्राबादला भारतात विलीन होण्याशिवाय पर्याय नाही परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. हैद्राबादने आपला मामला युनोकडे नेण्याचे ठरवलं होतं. रजाकारांचे अनन्वीत अत्याचार चालू होते हैद्राबादमध्ये युध्द छावणीचे स्वरूप आले होते. हैद्राबाद मध्ये सैन्य घुसवण्याचा निर्णय घेण्यात आला. रझाकरांचा धोका भारताच्या अस्तिवाला निर्माण झाला होता. हैद्राबादवरील सैनिक कारवाई १०८ तास चालली अखेर हैद्राबाद भारतात विलीन झाले. भारताचे अखंडत्व कायम राहिले. संस्थान व्यवस्थेचा अंत झाला भारतात ५६० संस्थानांचे एकत्रीकरण आणि विलीनीकरण करण्याचे श्रेय पटेलांना जाते. वेलस्लीने संस्थान पध्दती सुरू करून ब्रिटनच्या भारतीय साम्राज्यवादाचा पाया घातला होता तो शांततामय मार्गाने पटेलांनी मोडीत काढला. संस्थानिकांना आपल्या पूर्वाश्रमीच्या जीवनशैलीत जगता यावे म्हणून त्यांना चांगले तनखे दिले गेले त्यांना लोकशाही भारतात एक स्वतंत्र देशाचे सदस्य होण्याचा बरोबरीचा सन्मान देवून त्यांचे रक्षण केले. हैद्राबादप्रमाणेच काश्मीरचा प्रश्न पटेल सोडवू शकत होते का? तर पटेल म्हणतात जर नेहरू आणि अय्यंगार यांनी काश्मीरला माझ्या गृह आणि राज्य खात्यातून काढून त्याला आपली खाजगी जहागीर बनवलं नसतं तर हैद्राबादच्या संकटावर जसा तोडगा काढला तसाच तोडगा निघाला असता. खोऱ्याचा भाग पाकिस्तानला देवून पूर्व पाकिस्तानचा भाग भारताला देवून काश्मीर प्रश्न सोडवला असता. पटेलांनी भारतात संस्थान विलीनकरण्याच्या बाबतीत घेतलेली भुमिका अत्यंत कठोर होती म्हणूनच ते लोह पुरूष म्हणूनच ओळखले जातात.

संदर्भ –

१. लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल – बी. कृष्णा. अनुवाद विलास गिते
दैनिक सकाळ

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal, Tal.Shirur, Dist.Pune.412403